**काटीपाटी बॅरेज (सं.)प्रकल्प**
**ता.अकोला,जि.अकोला या योजनेस**
**प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता**
**प्रदान करणे बाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**
**महामंडळाचा निर्णय क्रमांक:-२५/विपाविम/कातां ७(२)/काटीपाटी (सं.)बॅरेज/प्रथम सुप्रमा/(धा.क्र.४०/२०२३) /२०२४ दि. १६.०२.२०२४.**

**संदर्भ** :-१)मुळ प्रशासकीय मान्यतेचा महामंडळाचा निर्णय क्र.विपाविम/कातां- ७/५८०/काटीपाटी (सं)/प्रमा/(१६१ / २००९)/२००९, दि.१४/०७/२००९.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि.०९/०९/२०१५
३) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र क्र.रातांसस (१)/काटीपाटी बॅरेज (सं.)/ (धा.क्र.२३/२०२२)/(५५०/२०२३), दि.२१/०६/२०२३.
४) शासन पत्र संकीर्ण-२०२३/प्र.क्र.(३६२/२०२३)/लपा, दि.०४/०८/२०२३.
५) विपाविम नियामक मंडळाचे दि.२८/१२/२०२३ रोजी संपन्न ८४ व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र ८४/८.

-----------ooooooooooooooooo---------

**प्रस्तावना :-**

काटीपाटी बॅरेज (सं.) प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत खारपाण क्षेत्रातील असून अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील काटी गावाजवळ पूर्णा नदीवर (बॅरेज व मातीचे धरण) बांधण्यात येत आहे.सदर प्रकल्प तापी खोऱ्याच्या पूर्णा उपखोऱ्यात जिगांव मोठया प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्रातील आहे. हा प्रकल्प विदर्भातील खारपाणपट्टयातील असून बळीराजा जलसंजीवनी योजने (BJSY) अंतर्गत समाविष्ट आहे. सदर प्रकल्पामुळे अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील काटी, पाटी, किनखेड, केळीवेळी, रोहणा व वडद या ६ गावातील १८०० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

काटीपाटी बॅरेज प्रकल्पास महामंडळाचे संदर्भिय पत्र क्र.१ नुसार रु.६४.३२ (रु.चौसष्ट कोटी बत्तीस लक्ष फक्त) किंमतीस (दरसूची सन २००८-०९ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसूचीचीतील बदल, भुसंपादन व पुनर्वसनाच्या किंमतीतील वाढ, संकल्प चित्रातील बदल,अपुऱ्या तरतूदीमुळे झालेली वाढ व अनुषंगिक खर्चात झालेली वाढ इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा अधिक असल्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

काटीपाटी बॅरेज (सं.) प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास,राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती(१),नाशिक,यांचे दि. ०१.०३.२०२३ रोजीच्या १८९ व्या बैठकीत Clearance बाबत निर्णय झाला असून छाननी अहवाल पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.सदर प्रकल्पाची मुळ मंजूर प्रशासकीय मान्यता किंमत रु.६४.३२ कोटीच्या तुलनेत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावानुसार प्रकल्पाची प्रस्तावित किंमत रु.३९०.३० कोटीने जास्त आहे.

किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रु.कोटी | मंजूर मुळ प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे | ११६.९१ | १८१.८६% | २९.९७% |
| २ | भुसंपादन व पुनर्वसनातील वाढ | ५२.२५ | ८१.२४% | १३.३९% |
| ३ | संकल्प चित्रातील बदलामुळे झालेली वाढ | १८१.२१ | २८१.७१% | ४६.४३% |
| ४ | अपुऱ्या तरतूदीमुळे झालेली वाढ | ९.४२ | १४.६६% | २.४२% |
| ५ | अनुषंगिक खर्चात झालेली वाढ | ३०.४९ | ४७.४१% | ७.८१% |
| | **एकूण** | **३९०.३०** | **६०६.७८%** | **१००%** |

विदर्भातील प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

नियामक मंडळाचे दि. २८.१२.२०२३ रोजी संपन्न ८४ व्या बैठकीतील मंजुर ठराव क्र. ८४/०८ नुसार काटीपाटी बॅरेज (सं.) योजनेच्या रु.४५४.६२ कोटी अंदाजित किंमतीच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील मुद्दा क्र.२६ व २७ ची पुर्तता करण्याच्या अटीच्या अधिन राहून, मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरीता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय:-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या या निर्णयान्वये अकोला जिल्हयातील काटीपाटी बॅरेज (सं.) ता. जि.अकोला या प्रकल्पास दरसूची २०२२-२३ वर आधारीत रु.४५४.६२ कोटी (रु. चारशे चौपन्न कोटी बासष्ट लक्ष फक्त ) किंमतीस (प्रत्यक्ष कामासाठी एकुण रु.४१८.७९ कोटी व अनुषंगिक खर्च रु.३५.८४ कोटी) मुददा क्र.२ मध्ये नमुद अटींच्या अधिन राहून प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रकल्पाचा उपशिर्षनिहाय किंमतीचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**१. योजनेच्या ठळक बाबी :-**

| | | |
|---|---|---|
| अ) | योजनेचे सिंचन क्षेत्र | १८०० हेक्टर |
| ब) | योजनेचा एकूण पाणीसाठा | ८.२४५ दलघमी |
| क) | योजनेच्या पाणीसाठयाची किंमत प्रति स.घ.मी. | रु. ५,५१,३७८/-(मापदंड रु.२९३११८= ३ X ०.८० X १२२१३२) (सर्वसाधारण क्षेत्रातील प्रकल्पासाठीच्या मापदंडाच्या ३ पट) |
| ड) | योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | १.६७- (मापदंड नाही) |
| इ) | अंतर्गत परतावा दर-(IRR) | १२.७१- (मापदंड नाही) |

**२.** सदर प्रकल्पास प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२.१) सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

२.२) सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रिय स्तरावरील निर्णयास किंवा झालेल्या क्षेत्रिय अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

२.३) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे या प्रकल्पाबाबत सुरु असलेल्या अथवा भविष्यात उदभवणा-या विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही, ती तशीच चालु ठेवावी.

२.४) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

२.५) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत.पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

२.६) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

२.७)"महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-याकडून व्यवस्थापन अधिनियम २००५"नुसार लाभ धारकांची पाणी वापर संस्था स्थापन करणेबाबत वेळेवर कार्यवाही करावी.

२.८) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील नमूद मुद्दा क्र. २६ व २७ चे अनुपालन करण्यात यावे.

२.९) प्रकल्पाचे काम नियोजनानुसार पूर्ण करण्यात यावे.

**३.** या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५),विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२-५१०१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**४.** या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता महामंडळाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता नोंदवहीत **(०४/२०२४)** या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

**५.** सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

**६.** सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

**"मुळ प्रत मा.का.सं.यांना मान्य"**
**हपत्र :- परिशिष्ट-१**

**(एन.आर.दळवी)**
**अधीक्षक अभियंता,**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ**
**नागपूर**

**प्रत:- (सहपत्रासह)**

१. मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा),यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.-३२.
२.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-32. 2.
३.अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
४.अपर मुख्यसचिव, (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
५.सचिव (ला.क्षे.वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
६. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
७. महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक.
८.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखापरिक्षा), नागपूर
१०. आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
११. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प जलसंपदा विभाग, अमरावती.
१२. आंतर वित्त सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सहसचिव (निवंस), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
१४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
१५. जिल्हाधिकारी, अकोला.
१६. अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला.
१७. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, अकोला
१८. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती.
१९. वित्तविभाग, (व्यय-12), मंत्रालय, मुंबई-32.
२०. नियोजन विभाग, (कार्यासन 1434), मंत्रालय, मुंबई-32.
२१. कातां ७-(४). संग्रहार्थ.
२२. चित्र शाखा, संग्रहार्थ.

काटीपाटी बॅरेज (सं.) प्रकल्प
ता.अकोला, जि.अकोला या योजनेस
प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता
प्रदान करणे बाबत.

**महामंडळाचा निर्णय क्रमांक:- २५/विपाविम/कातां ७(१)/काटीपाटी (सं.)प्रकल्प /प्रथम सुप्रमा/(धा.क्र.४०/२०२३)/२०२४ दि. १६.०२.२०२४ चे सहपत्र**

**परिशिष्ट-१**

**काटीपाटी बॅरेज (सं.) प्रकल्प**

**ता.अकोला जि. अकोला**

**प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता**

**प्रकल्पाची उपशिर्षनिहाय किंमत**

(किंमत रु.कोटी)

| अ.क्र. | उपशिर्ष | मुळ प्रमा नुसार (दरसूची २००८-०९) | प्रथम सुप्रमानुसार (दरसूची २०२२-२३) |
|---|---|---|---|
| १ | "अ" - प्राथमिक | ०.०९ | ३.२७ |
| २ | "ब" - भूसंपादन | ५.५४ | ५७.८० |
| ३ | "क" - बांधकाम | ५१.२६ | ३४९.३७ |
| ४ | "के" - इमारती | ०.२१ | ०.२६ |
| ५ | "एम" - वृक्षारोपण | ०.१३ | ०.५२ |
| ६ | "ओ" - संकिर्ण | १.०३ | ३.४९ |
| ७ | "पी" - देखभाल व दुरुस्ती | ०.५१ | ३.५० |
| ८ | "आर" - दळणवळण | ०.१६ | ०.५० |
| ९ | "क्ष" -पर्यावरण | ०.०५ | ०.०५ |
| | **एकूण कामाप्रित्यर्थ किंमत** | **५८.९८** | **४१८.७८** |
| | **अनुषंगिक खर्च** | ५.३४ | ३५.८४ |
| | **योजनेची एकूण किंमत** | **६४.३२** | **४५४.६२** |

"मुळ प्रत मा.का.सं.यांना मान्य"

(एन.आर.दळवी)
अधीक्षक अभियंता,
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
नागपूर